MHYA070023142022 फौजदारी कि. अर्ज क्र. २४६/२०२२

<u>नि.क्र. ०१ खालील आदेश</u>

सदरील अर्ज हा अर्जदार यांनी जन्ममृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदार नामे हिना कौसर मोहम्मद सुफी (हिना कौसर तौसीफ अहमद, लग्नानंतरचे नाव) यांचा जन्म दि.१०/०८/१९८० रोजी दारव्हा येथे झालेला आहे. परंतु अर्जदार यांच्या जन्माची नोंद नगर परिषद, दारव्हा ता. दारव्हा येथे वेळेत झालेली नाही. त्यांना जन्म नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. परंतु नगर परिषद, दारव्हा ता. दारव्हा जि. यतवमाळ यांनी अर्जदाराच्या जन्माची नोंद वेळेत केलेली नसल्याने तिची जन्माची नोंद रेकॉर्डला नसल्याबाबतचे दि.२८/०९/२०२२ रोजीचे पत्र दिलेले आहे.

२. अर्जदार यांनी नि.क्र.०३ वर दाखल कागदपत्रांची वर्णनयादी दाखल केलेली असून अ.क्र.१ वर हिना कौसर मोहम्मद सुफी यांच्या जन्माची नोंद नगर परिषद, दारव्हा ता. दारव्हा येथे नसल्याबाबतचे दि.२८/०९/२०२२ रोजीचे पत्र दाखल आहे. तसेच अर्जदाराने तिचे आधारकार्ड, मतदान कार्डची प्रमाणित प्रत व शाळा सोडल्याचा दाखला आणि माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्राची स्थळप्रत दाखल केलेले आहे. तसेच १९/१०/२०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या दैनिक हिंदुस्थान मध्ये दिलेल्या नोटीस दाखल केली आहे. नगर परिषद, दारव्हा ता. दारव्हा यांना समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच नि.क्र. ०९ अर्जदाराचे स्वतःचे शपथेवरील प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे वर नमुद कागदपत्रांची पडताळणी करीता असे निदर्शणास येते की, अर्जदार हिचा जन्म दि. १०/०८/१९८० रोजी दारव्हा ता. दारव्हा येथे झालेला आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

जन्म मुत्यू निबंधक, नगर परिषद, दारव्हा ता. दारव्हा यांनी अर्जदार हिना कौसर मोहम्मद सुफी (हिना कौसर तौसीफ अहमद, लग्नानंतरचे नाव) हिचा दि. १०/०८/१९८० रोजीच्या जन्माची नोंद घेवून त्यासंदर्भातील जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र अर्जदारास यांना देण्यात यावे.

Digitally signed by AARTEE ARUN PUND
Date: 2022.12.09 10:57:29 +0530

दारव्हा
दि.०२/१२/२०२२

(सौ. ए. ए. पुंड)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय, क्र.२, दारव्हा